क्र.साप्रवि/रवका/सा.आ.९३/न.क्र.५/
**महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या.**
एस्ट्रेला बॅटरीज विस्तारित इमारत,
तळ मजला, धारावी रोड, माटुंगा,
मुंबइ - ४०० ०१९.

# प्रशासकीय परिपत्रक क्र.२७ दिनांक २०/०३/२००६.

**विषय :** रजा प्रवास सवलत उपभोगण्यासाठी वाढीव कालावधी (Grace Period).

**वाचा :** १) स.सा.आ.क्र.९३(क) दि. ५/३/१९८०
२) स.सा.आ.क्र.९३(क) चे सुधारपत्र क्र.७ दि. २४/३/१९८८

.............

स.सा.आदेश क्र.९३(क) दि. ५/३/१९८० अंतर्गत चालू गटवर्ष २००४-२००५ मधील मूळ गावी जाण्या-येण्यासाठी रजा प्रवास सवलत उपभोगता यावी यासाठी कालावधी वाढवून मिळावा अशी मुख्य व क्षेत्रीय कार्यालयातील कर्मचा-यांकडून मागणी केली जात आहे.

२. सदर मागणीचे परीक्षण केले असता असे निदर्शनास आले की स.सा.आदेश क्र.९३(क) दि.५/३/१९८० चे सुधारपत्र क्र.७ दि. २४/३/१९८८ अन्वये रजा प्रवास सवलत नियम क्र.३ खाली अंतर्भूत केलेल्या टीप-३ मधील तरतुदीनुसार कामाची निकड, संप इत्यादी कारणांमुळे सक्षम अधिका-यांकडून एखाद्या कर्मचा-याच्या बाबतीत रजा किंवा परवानगी नाकारली गेली असल्यामुळे जर तो रजा प्रवास सवलत उपभोगू शकला नसेल तर तो कर्मचारी आणि त्याचे कुटुंबीय नियमित गटवर्ष कालावधीच्या वाढीव मुदतीत (Grace Period), रजा प्रवास सवलत उपभोगू शकतात. सबब, वरील प्रमाणे वाढीव मुदतीमध्ये (Grace Period) सवलत उपभोगण्याची तरतूद असूनही सदर सवलत उपभोगण्यासाठी कालावधी वाढवून मिळण्याची मागणी काही गैरसमजुतीचे आधारे करण्यात येत असावी असे दिसते.

३. यास्तव सुधारपत्र क्र.७ दि. २४/३/१९८८ अन्वये समाविष्ट करण्यात आलेल्या सदर तरतुदीत अधिक सुस्पष्टता आणण्यासाठी रजा प्रवास सवलत मंजूर करण्यासंदर्भात खालीलप्रमाणे खुलासा करण्यात येत आहे.

क) रजा प्रवास सवलतीचे गटवर्ष चार वर्षांचे आहे. सदर गटवर्षात कर्मचारी पहिल्या दोन वर्षाच्या गटासाठी एकदा आणि नंतरच्या दोन वर्षाच्या गटासाठी एकदा, अशा एकूण दोन सवलतींचा लाभ घेऊ शकतात. सदर दोन सवलती ते पुढीलप्रमाणे घेऊ शकतात.

i) दोन्ही सवलती (मूळगावी ) स्वग्रामी (Home Town) जाण्या-येण्यासाठी

**किंवा**

ii) पहिली सवलत भारतात कोठेही (Any Place in India) जाण्या-येण्या साठी व दुसरी (मूळगावी ) स्वग्रामी (Home Town) जाण्या-येण्यासाठी.

**किंवा**

iii) पहिली सवलत (मूळगावी )स्वग्रामी (Home Town) व दुसरी भारतात कोठेही (Any Place in India) जाण्या-येण्यासाठी

ख) वरीलप्रमाणे रजा मुदत सवलत एका कॅलेंडर वर्षामध्ये (पहिल्या व दुस-या दोन वर्षांच्या गटवर्षासाठी) दोनदा उपभोगता येईल. [उदा.गटवर्ष २००४-२००५ ची एक सवलत व गटवर्ष २००५-२००६ ची दुसरी सवलत या दोन्ही सवलती कॅलेंडर वर्ष २००६ मध्ये उपभोगता येतील.] मात्र कोणत्याही परिस्थितीत चार वर्षांच्या गटवर्षात भारतात कोठेही (Any place in India) जाण्या येण्यासाठी दोन (२) सवलती अनुज्ञेय असणार नाहीत.

४. उपरोक्त खुलाशास अनुसरुन चालू गटवर्ष २००४-२००७ ची सवलत उपभोगण्यासाठीचा नियमित कालावधी व वाढीव कालावधी (Grace Period)पुढीलप्रमाणे राहील :-

**रजा प्रवास सवलत उपभोगण्याचा नियमित व वाढीव कालावधी (गटवर्ष २००४-२००७).**

| अ. क्र. | गटवर्ष | सवलत उपभोगण्याचा नियमित कालावधी | नियमित कालावधी नंतरचा वाढीव कालावधी (Grace Period) | वाढीव कालावधीचा लाभ घेण्यासाठी अट |
|---|---|---|---|---|
| १ | २००४-२००५ | १/१/२००४ ते ३१/१२/२००५ | ३१/१२/२००६ पर्यंत | नियमित कालावधीत उपभोगलेली नसावी. |
| २ | २००६-२००७ | १/१/२००६ ते ३१/१२/२००७ | ३१/१२/२००८ पर्यंत | नियमित कालावधीत उपभोगलेली नसावी. |

५. रजा प्रवास सवलतीचा वाढीव कालावधी (Grace Period) यापुढील प्रत्येक गटवर्षासाठी वर स्पष्ट केल्यानुसार राहील.

६. यानुसार, आता नियमित गटवर्ष कालावधीमध्ये रजा प्रवास सवलतीचा लाभ घेते वेळी रजा किंवा परवानगी नाकारली नसली तरीही कर्मचारी वाढीव कालावधीमध्ये (Grace Period) रजा प्रवास सवलतीचा लाभ घेऊ शकेल.

७. वरील तक्त्यामध्ये स्पष्ट केलेली तरतूद स.सा.आदेश क्र. ९३(क) दिनांक ५.३.१९८० सोबतच्या अनुसूचीतील नियम क्र.७ मधील तरतुदीनुसार कर्मचारी आणि त्याचे कुटुंबीय त्यांच्या सोयी प्रमाणे एकत्रितपणे किंवा विभक्तपणे गटवर्षाच्या नियमित कालावधीमध्ये किंवा त्यानंतरच्या वाढीव कालावधीमध्ये रजा प्रवास सवलतीचा लाभ घेण्यास पात्र असतील. त्याचप्रमाणे कर्मचारी नियमित कालावधीमध्ये व कुटुंबीय वाढीव कालावधीमध्ये किंवा या उलट प्रकरणपरत्वे रजा प्रवास सवलतीचा लाभ घेऊ शकतील.

८. एखाद्या कर्मचा-याने किंवा त्याच्या कुटुंबीयांनी नियमित कालावधीत किंवा त्यानंतरच्या वाढीव (Grace Period) कालावधीत रजा प्रवास सवलत उपभोगली नसल्यास त्या कर्मचा-याचा संबंधित दोन वर्षाच्या गटवर्षावरील हक्क (Title) व्यपगत झाला असल्याचे समजण्यात येईल.

९. सदर परिपत्रक व्यवस्थापकीय संचालक, म.रा.वि.वितरण कंपनी मर्या., यांनी दिलेल्या मंजुरीनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

(सुभाष पाटील)
मुख्य महाव्यवस्थापक(कर्मचारीवर्ग)

प्रत :

म.रा.वि.वितरण कंपनी मर्या.च्या विभागीय व त्यावरील कार्यालयीन स्तरापर्यंत.

D:\O&M Cell\Circular-LTC-CS7.doc